# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे कार्यालय
रामनगर सृष्टी, मीरारोड पुर्व ता. जि. ठाणे
फोन नं. ०२२-२९४५१००१
Mail ID- pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक:- ७२-२२** **दिनांक - ०४/०३/२०२२**

## कोविड-१९ निर्बंधांच्या शिथिलतेबाबत पोलीस उप आयुक्त (मुख्यालय) यांचे फौजदारी दंड प्रक्रिया संहिता सन १९७३ चे कलम १४४ (१) (३) प्रमाणे नविन आदेश जारी.

मागील काही दिवसांमध्ये कोराना विषाणुचा ओमिक्रॉन व्हेरीयंट समोर आला असतांना त्याचा वेगात प्रसार होत असल्यामुळे त्यास प्रतिबंध करण्यासाठी शासनाचे वतीने वेळोवेळी प्रतिबंधात्मक आदेश निर्गमीत करण्यात आले होते. त्याअनुषंगाने मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रामध्ये देखील विविध आस्थापना, सेवा, कार्यक्रम व शाळा चालू ठेवण्यातबाबत निर्बंध लावण्यात आले होते. मात्र सध्या कोविड-१९ चा प्रसार बऱ्याच प्रमाणात कमी झाल्याने राज्य शासनाचे वतीने उपरोक्त बाबतीत लागू असलेल्या निर्बंधांमध्ये शिथिलता दिल्याने त्यास अनुसरुन मिरा-भाईंदर,वसई-विरार पोलीस आयुक्तालय कार्यक्षेत्रातील मिरा-भाईंदर व वसई-विरार महानगरपालिका कार्यक्षेत्राकरिता श्री. विजयकांत सागर, पोलीस उप आयुक्त (मुख्यालय), मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय यांनी फौजदारी प्रक्रिया संहिता १९७३ चे कलम १४४ (१) (३) अन्वये आदेश जारी करुन विवाह सोहळे, सामाजिक, राजकीय किंवा धार्मिक कार्यक्रम/क्रिडा स्पर्धा, संमेलन मेळावे, अंत्यविधीचे कार्यक्रम, जिम, सलून, स्पा, पुर्व प्राथमिक शाळा, अंगणवाड्या, घरपोच सेवा, आंतरराज्य प्रवास, आस्थापना क्षमता इत्यादींबाबत खालीलप्रमाणे सुधारित शिथिलता नियम लागू केले असल्याबाबतचे आदेश जारी केले आहे.

१) सामाजिक/क्रीडा/मनोरंजन/शैक्षणिक/सांस्कृतिक/धार्मिक/राजकीय/उत्सव, विवाह आणि अंत्यसंस्कार आणि इतर मेळावे आणि मंडळाशी संबंधित कार्यक्रमांना एकुण उपस्थिती क्षमतेच्या ५०% किंवा २०० यापैकी जी कमी असेल तितकी उपस्थिती अनुज्ञेय राहील.

२) महाराष्ट्र शासनाच्या संबंधित प्रशासकीय विभागाच्या कोणत्याही आदेशाच्या अधीन राहून सर्व शैक्षणिक संस्थामध्ये ऑफलाईन वर्ग पुन्हा सुरु होऊ शकतात. सर्व शैक्षणिक संस्थांच्या प्रशासनांना ऑनलाईन आणि ऑफलाईन पध्दतीने शिक्षण देण्याच्या हायब्रीड मॉडेलचा फायदा घेण्यासाठी प्रोत्साहित करण्यात येत आहे. सर्व पुर्व प्राथमिक शाळा तसेच अंगणवाड्या आता प्रत्यक्षरीत्या सुरु करता येतील. या सर्व संस्था/आस्थापना कोविड विषयक मार्गदर्शन तत्वाचे काटेकोरपणे पालन करतील.

३) सर्व घरपोच सेवांना परवानगी राहील.

४) सर्व व्यापारी संकुले, सिनेमा हॉल, उपहारगृहे आणि बार, क्रिडा संकुले, व्यायाम शाळा, स्पा, जलतरण तलाव, धार्मिक स्थळे, नाट्यगृहे, पर्यटन स्थळे, मनोरंजन उद्याने, इत्यादीं ५०% क्षमतेने कार्यरत राहतील.

५) लसीकरण पूर्ण झालेल्या व्यक्तींसाठी आंतरराज्य आणि राज्यांतर्गत हालचालींवर कोणतेही निर्बंध नसतील. पूर्णपणे लसीकरण न झालेल्या व्यक्तींसाठी, आतंरराज्य हालचाली ७२ तासांसाठी वैध RT-PCR चाचणी प्रमाणपत्राच्या आधीन असतील. अशा प्रवासासाठी आपत्ती व्यवस्थापन यंत्रणेच्या आवश्कते व्यतिरिक्त कोणत्याही ना-हरकत प्रमाणपत्राची गरज असणार नाही.

६) शासकीय आणि खाजगी कार्यालये पूर्ण क्षमतेने सुरु राहतील.

७) सर्व औद्योगिक आणि वैज्ञानिक संस्था पूर्ण क्षमतेने सुरु राहतील.

८) येथे समाविष्ट नसलेल्या इतर उपक्रमासाठी ५०% क्षमतेची मर्यादा राहील व याबाबत काही विवाद उद्भवल्यास जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचा निर्णय अंतिम राहील.

**सदरील मनाई आदेश दिनांक ०४/०३/२०२२ रोजीचे रात्रौ ००.०१ वा. पासुन मिरा-भाईंदर, वसई-विरार शहर महानगरपालिका कार्यक्षेत्राकरिता पुढील आदेशापर्यंत लागू राहणार आहेत.**

--००--